श्री.अशोक बप्पासाहेब नरसाळे,ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-देवटाकळी, ता.शेवगाव यांना पदावरुन तात्पुरते दूर करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/३०१ /२०२५
दिनांक - ११/१२/२०२५

संदर्भ :- १.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांची दि.१०.१२.२०२५ रोजी ग्रामपंचायत देवटाकळी,ता.शेवगांव येथे दिलेली भेट.
२.महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चा नियम ३
३.महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील)नियम १९६४ मधील नियम क्र.३ (१) (अ)

ज्याअर्थी ग्रामपंचायत-देवटाकळी, ता.शेवगाव येथे संदर्भ क्र.१ नुसार भेट दिली असता, ग्रामपंचायत कार्यालयीन कामी पुर्णवेळ उपस्थित न राहणे, कर आकारणी व कर वसुली मध्ये अक्षम्य दुर्लक्ष असणे, ग्रामपंचायत अभिलेखे अपुर्ण असणे तसेच मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानामध्ये असमाधानकारक कामकाज असणे याबाबी भेटीमध्ये दिसुन आल्या असुन सध्या कार्यरत असलेले श्री.अशोक बप्पासाहेब नरसाळे, ग्रामपंचायत अधिकारी यांनी कर्तव्यात कसुर केलेला आहे. जिल्हा परिषद कर्मचा-याने सदैव निरपवाद, सचोटीने वागणे व कर्तव्यपरायण असणे आवश्यक आहे. तथापि, श्री.अशोक बप्पासाहेब नरसाळे, ग्रामपंचायत अधिकारी यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेले आहे. कर्तव्याचे पालन न करुन गैरवर्तन केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेला आहे.

त्याअर्थी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम क्र.३ (१) (अ) मध्ये दिलेल्या तरतूदीस अधीन राहून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा शिस्तविषयक प्राधिकरण जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशाव्दारे श्री.अशोक बप्पासाहेब नरसाळे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-देवटाकळी, ता.शेवगाव यांचे विरुध्द शिस्तविषयक कार्यवाही अनिर्णित असल्याने सदरचा आदेश बजावलेच्या दिनांकापासून जिल्हा परिषद सेवेतून ग्रामपंचायत अधिकारी या पदावरुन सेवानिलंबीत करीत आहे.

आणखीं, असाही आदेश देण्यात येत आहे की, हा आदेश अंमलात राहील तेवढया कालावधीत श्री.अशोक बप्पासाहेब नरसाळे,ग्रामपंचायत अधिकारी यांचे मुख्यालय पंचायत समिती --नेवासा---- येथे राहील आणि श्री.अशोक बप्पासाहेब नरसाळे,ग्रामपंचायत अधिकारी यांना सेवानिलंबन कालावधीत देण्यात आलेल्या मुख्यालयातील तालुक्याचे गटविकास अधिकारी पंचायत समिती यांच्या पूर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

श्री.अशोक बप्पासाहेब नरसाळे,ग्रामपंचायत अधिकारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन,बडतर्फी व सेवेतुन काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ च्या तरतूदी नुसार निलंबन भत्ता व पुरक भत्ते देण्यात यावेत. निलंबनाच्या कालावधीत श्री.अशोक बप्पासाहेब नरसाळे, ग्रामपंचायत अधिकारी यांनी खाजगी नोकरी स्विकारु नये. त्यांनी तसे केल्यास त्याबाबतचे पुरवणी दोषारोप त्यांचेवर ठेवण्यात येतील. तसेच ते निलंबन निर्वाह भत्ता गमविण्यास पात्र ठरतील.

निलंबनाचे कालावधीत, श्री.अशोक बप्पासाहेब नरसाळे,ग्रामपंचायत अधिकारी यांना निलंबन निर्वाह भत्ता जेंव्हा जेव्हा देण्यात येईल त्या त्या वेळी आपण खाजगी नोकरी स्विकारली नाही अथवा कोणताही

खाजगी धंदा व व्यवसाय करीत नाही, अशा आशयाचे प्रमाणपत्र श्री.अशोक बप्पासाहेब नरसाळे,ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-देवटाकळी, ता.शेवगाव यांनी त्यांना सेवानिलंबीत करुन दिलेल्या मुख्यालयाचे तालुक्याचे गटविकास अधिकारी पंचायत समिती यांना सादर करावे.

निलंबनाचे कालावधीत श्री.अशोक बप्पासाहेब नरसाळे,ग्रामपंचायत अधिकारी यांना निलंबन निर्वाह भत्ता देण्याबाबतची कार्यवाही सेवानिलंबीत करुन देण्यात आलेल्या मुख्यालयाचे गटविकास अधिकारी पंचायत समिती ...नेवासा........ हे करतील.

या आदेशाची नोंद श्री.अशोक बप्पासाहेब नरसाळे,ग्रामपंचायत अधिकारी यांच्या मूळ सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी. सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२५१२११०४०९६८ असा आहे.

(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. श्री.अशोक बप्पासाहेब नरसाळे,ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-देवटाकळी, ता.शेवगाव.
व्दारा व प्रत :- गटविकास अधिकारी पंचायत समिती शेवगाव.
२. गटविकास अधिकारी पंचायत समिती शेवगाव,जि.अहिल्यानगर.
२/-सदर सेवा निलंबन आदेश श्री.नरसाळे, ग्रामपंचायत अधिकारी यांना तात्काळ बजावून दिनांकीत स्वाक्षरी घेण्यात यावी व सदरची प्रत उलट टपाली या कार्यालयास विनाविलंब सादर करावी.
३. गटविकास अधिकारी पंचायत समिती ---नेवासा------ जि.अहिल्यानगर
४. मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर
५. निवड नस्ती

(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर